GR-200504261722221001-0100

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२
शासकीय माहिती अधिकारी / अपीलीय प्राधिकारी
यांच्याविरूद्धच्या तक्रारींबाबतची कार्यवाही...........

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्र.ममाअ-२००५/प्र.क्र.९१/०५/५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ११ एप्रिल २००५

शासन परिपत्रक :-

"महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२" व त्याखालील नियमातील तरतुदींनुसार माहिती मिळण्यासाठी करण्यात येत असलेल्या अर्जांवर संबंधित शासकीय माहिती अधिकाऱ्याने १५ दिवसांत (आवश्यक तेथे वाढीव कालावधीत) निर्णय घेणे आवश्यक आहे (कलम ६), तसेच संबंधित शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाने वा निर्णयाअभावी व्यथित होऊन केल्या जाणाऱ्या अपील अर्जांवर ३० दिवसांत (आवश्यक तेथे वाढीव कालावधीत) निर्णय घेणे आवश्यक आहे (कलम ११). त्याचप्रमाणे कसूरदार शासकीय माहिती अधिकाऱ्यांविरूद्ध दंडात्मक/शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची तरतूदही या अधिनियमात करण्यात आलेली आहे (कलम १२) आणि कसूरदार अपीलीय प्राधिकारी "कर्तव्यातील कसूर" या कारणाकरिता शिस्तभंग कारवाईस पात्र असतील असेही शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.ममाअ-२००४/प्र.क्र.३४/०४/५, दिनांक ६ जुलै, २००४ द्वारे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

शासनाकडे वेळोवेळी अर्ज करून शासकीय माहिती अधिकाऱ्यांकडून कसूर झालेली असूनही दंडात्मक कारवाई होत नसल्याचे तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून विहित मुदतीत अपीलांवर निर्णय घेतले जात नसल्याचे निदर्शनास आणले जात आहे. अशा तक्रारीची दखल घेऊन संबंधितांविरूद्ध योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार संबंधित सक्षम प्राधिकारी यांना आहेत. तथापि, सर्वसामान्य नागरिकांना सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांची माहिती उपलब्ध करून देण्याची कार्यवाही अद्याप पूर्ण व्हावयाची आहे. त्यामुळे अशा बहुतांश तक्रारी सामान्य प्रशासन विभाग किंवा मुख्य सचिवांकडे प्राप्त होत आहेत. त्यासंदर्भात आता खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी असा निर्णय शासनाने घेतला आहे.

सामान्य प्रशासन विभाग अथवा मुख्य सचिवांकडे प्राप्त होणारे अर्ज सोबतच्या पत्र 'अ' अनुसार कळवून संबंधित प्रशासकीय विभागाकडे हस्तांतरित करण्यात येतील. संबंधित विभागाने अशा तक्रारींसंबंधात सोबत जोडलेल्या प्रपत्र 'ब' मधील नमुन्यानुसार नोटीस पाठवून संबंधित शासकीय माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांचेकडून खुलासा मागविण्याची कार्यवाही विनाविलंब करावी. खुलासा प्राप्त झाल्यावर त्याची छाननी करण्यात यावी व त्याआधारे संबंधित माहिती अधिकारी/अपिलीय प्राधिकारी दोषी ठरतात वा नाही

याबद्दलचा निष्कर्ष काढावा आणि दोषी अधिकाऱ्यांविरूद्ध दंडनीय कारवाई/शिस्तभंगाची कारवाई करण्याची कार्यवाही करावी. मात्र तसे करताना संबंधित अधिकाऱ्याला नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देऊन अशी कार्यवाही करण्यात यावी.

असा निर्णय झाल्यावर अर्जदारांना योग्य ते अंतिम उत्तर पाठविण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वंदना कृष्णा)
शासनाचे सचिव

सोबत :- १) अर्जदारांना पाठवावयाच्या पत्राचा नमुना (प्रपत्र 'अ')
२) नोटीसचा नमुना (प्रपत्र 'ब')

प्रत :-

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव,
*७) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*८) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
*९) महाप्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*१०) महाप्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
*११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*१३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४) सर्व विभागीय आयुक्त,
१५) सर्व जिल्हाधिकारी / जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६) सर्व महानगरपालिका आयुक्त,
१७) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग / कार्यालय प्रमुख,
१८) सर्व मंत्रालयीन विभाग, व सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
*१९) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-४११ ००७
*२०) राज्य स्तरीय परिषदेचे सर्व सदस्य.
२१) निवड नस्ती. (२ प्रती)

* (पत्राने)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिताच्या बोधचिन्हा (LOGO ) बाबत**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन परिपत्रक क्रमांक - केमाअ २०११ /४०८/प्र.क्र.२२९/११/सहा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २२/११/२०११.

**परिपत्रक :-**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिता केंद्र शासनाने " बोधचिन्ह " (LOGO) तयार केलेले आहे ( सोबत झेरॉक्स प्रत जोडली आहे ) हे बोधचिन्ह सर्व शासकीय कार्यालयात/ सार्वजनिक प्राधिकरणात जेथे कार्यालयीन टपाल स्वीकारले जाते तेथे ठळकपणे दृष्टीपथास पडेल अशा ठिकाणी प्रदर्शित करावयाचे आहे तसेच ते शासनाच्या सर्व प्रकारच्या लेखन सामुग्रीवर प्रादेशिक मराठी भाषेत छापून घेणे आवश्यक आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या बोधचिन्हाचा (LOGO) वापर कसा करावा याबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्रशासनाच्या www. rtigateway.org.in हया संकेतस्थळावर तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या gad.maharashtra.gov.in हया संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, मंत्रालयीन विभागामध्ये तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांच्या ठिकाणी हे बोधचिन्ह प्रदर्शित करण्याबाबत तसेच सर्व शासकीय सामुग्रीवरही छापून घेण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. याची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल या विभागास तात्काळ सादर करण्यात यावा.

४. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या wwwmaharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१११२२१११४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( नंदकुमार जंत्रे )
**सचिव ( प्र.सु.व र.व का. )**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम ४ व ५ च्या अंमलबजावणीबाबत

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्र - केमाअ २०१३/१५६/प्र.क्र.३६०/सहा,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ९ / ५ / २०१४.

<u>पहा:-</u> शासन आदेश क्रमांक- केमाअ २००९/६३१/प्र.क्र.२६७/०९/सहा, दि.२४/०७/२००९.

<u>परिपत्रक :-</u>

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा दि.१२/१०/२००५ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमातील कलम ४ (१) (क) मधील तरतूदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणांनी सर्व अभिलेख योग्य रितीने सूचीबध्द करुन त्याची निर्देशसूची तयार करणे व संगणकीकरण करणे, शक्य असेल अशा कार्यालयीन अभिलेखांचे वाजवी कालावधीत व साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण करणे व ही माहिती नेटवर्कवर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. कलम ४ (१) (ख) मधील तरतूदीनुसार हा अधिनियम अंमलात आल्यापासून १२० दिवसांच्या आत १७ बाबींवरील माहिती तयार करुन तो प्रसिध्द करणे आवश्यक होते. तसेच सदर माहिती वेळोवेळी अद्ययावतही करणे गरजेचे आहे. अधिनियमाच्या कलम ५(१) व ५(२) मधील तरतूदी पाहता सार्वजनिक प्राधिकरणांनी आवश्यक असतील तेवढया जास्तीत जास्त अधिका-यांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून निर्देशित करणे आवश्यक आहे. शासनाने या कार्यवाहीबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तथापि अनेक सार्वजनिक प्राधिकरणानी याबाबतची कार्यवाही अद्यापही पूर्ण केलेली नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने याबाबत पुन्हा खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) ज्या सार्वजनिक प्राधिकरणांनी अद्यापही कलम ४ च्या तरतूदींनुसार अपेक्षित १७ बाबींवरील माहिती तयार करुन जनतेकरीता उपलब्ध केलेली नाही व वेबसाईटवर प्रसिध्द केलेली नाही तसेच सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिका-यांना निर्देशित करुन त्यांचे फलक कार्यालयात दर्शनी ठिकाणी लावले नाहीत अशा सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी ही कार्यवाही प्राथम्यक्रमाने पूर्ण करावी.

२) सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना त्यांच्या स्तरावर आवश्यक सूचना देऊन याबाबत पाठपुरावा करावा.

३) ज्या कार्यालयांनी संकेत स्थळावरील (वेबसाईटवर ) माहिती अद्ययावत केली नसल्यास त्यांनी ती तातडीने अद्ययावत करावी.

४) या परिपत्रकातील सूचनांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या प्रशासकीय विभागांना सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५०९१६२४५४३७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KARPATE TIKARAM W

Digitally signed by KARPATE TIKARAM W
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KARPATE TIKARAM W
Date: 2014.05.09 16:29:19 +05'30'

( टि.वा.करपते )

अवर सचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव

३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे कार्यालया, मंत्रालय, मुंबई

४. सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

५. सर्व जिल्हाधिकारी

६. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई

७. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई, नागपूर, औरगांबाद व पुणे.

८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,

९. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) -१, महाराष्ट्र , मुंबई

१०.महालेखापाल ( लेखा परिक्षा )-१ महाराष्ट्र, मुंबई

११.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१२.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१३.निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन क्र.६

" ३ख. **अभिलेख तपासण्याकरिता त्याची मागणी करण्याची कार्यपद्धती.**—कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये अभिलेख तपासण्याकरिता त्याची मागणी करण्यासाठी अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जावर विचार करण्यात आल्यावर, जन माहिती अधिकाऱ्यास सदर अर्ज योग्य असल्याचे आढळून आल्यास, अर्जदारास अभिलेख तपासण्याकरिता परवानगी देण्यात येईल आणि जर अशी परवानगी त्याला मिळाली तर जन माहिती अधिकारी, अवलोकनार्थ अर्जदाराला पाहिजे असलेल्या अभिलेखांची विभागाच्या संबंधित कक्षाकडून मागणी करील आणि तो अभिलेख आपल्या उपस्थितीत किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत, कार्यालयीन वेळेत अर्जदारास देईल. अशा अभिलेख्यांची तपासणी करताना, अर्जदारास केवळ पेन्सिलचा वापर करण्याची परवानगी राहील आणि अर्जदारास पाहिजे असलेली माहिती त्याला पेन्सिलीनेच टिपून घेता येईल. जर अर्जदाराने पेन्सिल व्यतिरिक्त अन्य कोणतेही लेखनसाहित्य आणले तर तो ते लेखनसाहित्य जन माहिती अधिकाऱ्याकडे जमा करील, आणि त्यानंतर, त्याला अभिलेख तपासण्याची मुभा देण्यात येईल. अर्जदाराला तपासणीच्या वेळी जी पेन्सिल वापरण्याची मुभा देण्यात आलेली असेल त्या पेन्सिलीने अभिलेखावर कोणत्याही प्रकारची खूण करता येणार नाही. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नंदकुमार जंत्रे,**
शासनाचे सचिव.

RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ७३] गुरुवार, फेब्रुवारी २, २०१२/माघ १३, शके १९३३ [पृष्ठे ३
किंमत : रुपये १४.००

## असाधारण क्रमांक ११

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जानेवारी २०१२

**अधिसूचना**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक केंमाअ-२००८/१०१०/प्र.क्र. ३५६/सहा.— माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या कलम २७, पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

(१) या नियमांना, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (दुसरी सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

(२) महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ च्या नियम ३ क नंतर पुढील नियम ज्यादा दाखल करण्यात येईल :—

२. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ याच्या नियम ३ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" **३क. एक विनंती अर्ज केवळ एका विषयाशी संबंधित असणे.**—अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा आणि त्यात सर्वसाधारणपणे दीडशेपेक्षा अधिक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर तो त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील :

परंतु, एकापेक्षा अधिक विषयांशी संबंधित विनंती अर्ज केला असेल अशा प्रकरणी, जन माहिती अधिकारी, केवळ पहिल्या विषयाशी संबंधित विनंतीबद्दलच माहिती देईल आणि इतर प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र विनंती अर्ज करण्याचा सल्ला, अर्जदाराला देईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नंदकुमार जंत्रे,**
शासनाचे सचिव.

RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/SOUTH-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ६९]　　शुक्रवार, जानेवारी २०, २०१२/पौष ३०, शके १९३३　　[पृष्ठे ३
किंमत : रुपये १४.००

## असाधारण क्रमांक ७

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जानेवारी २०१२

## अधिसूचना

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक केमाअ. २००९/प्र.क्र. ३९८/०९/सहा.—माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या २७ कलम, पोट-कलमे (१) आणि (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदींनुसार व्यापक जनहिताशी संबंध नसलेली वैयक्तिक स्वरुपाची माहिती न पुरविण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा,**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: १७ ऑक्टोबर,२०१४

परिपत्रक :-

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ मध्ये जी माहिती पुरविण्याचे आबंधन माहिती अधिकाऱ्यावर असणार नाही त्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत. याच कलमाच्या पोटकलम (ञ) मधील तरतूदीनुसार जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती केंद्रिय जन माहिती अधिका-याची, राज्य जन माहिती अधिका-याची किंवा अपील प्राधिका-याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरुन, जी माहिती प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आंगतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधनही माहिती अधिका-यांवर नसल्याबाबत स्पष्टता करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यास त्याच्या सेवाकालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश, त्याच्या सेवा नियमांतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल, त्याच्या चल/अचल संपत्तीबाबतची माहिती, त्याने केलेली आर्थिक गुंतवणूक वा बँक किंवा अन्य वित्तिय संस्थांकडून घेतलेली कर्जे, त्याच्या मुलांच्या विवाहात मिळालेल्या भेटी, आयकर विवरणपत्र यासारखी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिका-यांवर नसल्याचा निर्णय स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२ गिरिश रामचंद्र देशपांडे विरूध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दि.३.१०.२०१२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. या संदर्भात निर्णय देताना मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णयपत्राच्या परिच्छेद १३ मध्ये पुढील प्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.

१३. We are in the agreement with the CIC and the courts below that the details called for by the petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure/punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of section ८(१) of RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the discloser of which would cause unwarranted invasion of privacy of that individual.

२. श्री.एच.ई.राजसरकरप्पा विरूध्द राज्य जन माहिती अधिकारी (याचिका क्र.१०६६३/२००६) मध्ये उच्च न्यायालय कर्नाटक यांनी दिलेल्या निर्णयाच्या आधारे विधि व न्याय विभागाने अनौ.संदर्भ

क्र.यु.ओ.आर. ४१०/१२६२/सिव्हील/कॉन्फिडेंस/अे ब्रँच/दि.३१.८.२०१२ अन्वये अभिप्राय देताना पुढील प्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.

" ꝺ. the information which does not constitute any public interest and which would warrant overriding the provisions of Section८(१)(g)(j) of RTI Act, २००५ are not expected to be provided to the applicant under this Act, especially when it is intended to score the personal dispute with third party does not constitute public interest.

In view of above judgment of Karnataka High Court and the legal provision discussed above the State government can issue guidelines for the purpose of this Act as provided under Section २६(३)(a) of the RTI Act, २००५."

३. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, वरिलप्रमाणे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (ञ) मधील तरतूदी नुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिका-यांवर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागविलेली माहिती, माहितीच्या अधिकारात अर्जदारास देण्यात येऊ नये.

३. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणे व त्यांच्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना वरिलप्रमाणे सूचित करावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१०१७१५२५४९२६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gosavi Pradeep P

Digitally signed by Gosavi Pradeep P
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Gosavi Pradeep P
Date: 2014.10.17 15:41:05 +05'30'

( प्र.प्र.गोसावी )
शासनाचे उपसचिव

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव
३) उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

GR-200411021445260001-0100

**महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२**
**अंतर्गत उद्भवणाऱ्या शंकांचे निरसन/स्पष्टीकरण**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : ममाअ-२००४/प्र.क्र.१३५/०४/०५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :१६/१०/२००४

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२ ची अंमलबजावणी करतांना शासकीय माहिती अधिकारी/अपिलीय प्राधिकारी यांना येत असलेल्या काही अडचणींबाबत संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी शासनास कळविले आहे. या अडचणीच्या मुद्दयांवर विचार होऊन आता खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे :-

| क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | कलम-७(च) खाली एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाशी संबंधित असलेली माहिती देता येणार नाही अशी तरतूद आहे. या कायद्याखाली कोणत्या प्रकारची माहिती देता येते किंवा देता येत नाही. | गोपनीय अहवालासंबंधीची माहिती देता येत नाही. मात्र, इतर प्रकारची माहिती देता येते. बदली किंवा नियुक्ती संबंधित माहिती देता येते. व्यापक जनहित संबंधित |
| २ | "अनियमित" निर्णय झालेल्या प्रकरणी माहिती देता येईल काय? | होय, जर निर्णय प्रक्रीया पूर्ण झाली असेल तर माहिती देता येईल. |
| ३ | शासकीय गुप्तता अधिनियम-१९२३ च्या तरतूदींमुळे जी उघड करण्यास मनाई केली आहे अशी माहिती देता येणार नाही. तरी या अधिनियमाच्या अंतर्गत कोणत्या प्रकारची माहिती देता येत नाही. | सदर कायदा साधारणतः देशाच्या संरक्षणाशी संबंधित कागदपत्रे व नकाशे, देशाच्या सार्वभौमत्व व एकात्मतेशी संबंधित कागदपत्रे, अंतर्गत सुरक्षितता, विदेशी राज्यांशी असलेले संबंध यावर परिणाम होईल, यासारख्या बाबींशी संबंधित आहे. सर्वसाधारण स्वरूपाचे शासनाच्या विविध विभागांचे दैनंदिन कामकाज या कायद्याखाली येत नाही. |
| ४ | एखाद्या प्रकरणात आपण सरकारी वकीलांचा सल्ला घेतो. त्या सल्ल्याची नक्कल माहितीच्या अधिकारात देता येते काय ? जर शासकीय वकीलांनी सल्ल्याची माहिती दिली असेल तर ती पुन्हा अर्जदारांस द्यावयाची काय ? | कलम-७(ड) खाली सदर माहिती नाकारता येते. जर शासकीय वकीलांच्या व शासनाच्या परस्पर संबंधाखाली सरकारी वकीलांनी सल्ला दिला असेल तर अशी माहिती देता येणार नाही. सदर माहिती दिल्यास संबंधित प्रकरणी शासनाच्या बाजूवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असेल तर ती माहिती पुरविण्याचे नाकारण्यात यावे. |
| ५ | शासन निर्णयांच्या प्रतींची नक्कल देता येईल काय ? | होय. |
| ६ | काही अर्जदार विविध प्रश्न व त्यावर करावयाची कार्यवाही याची माहिती मागतात. एखादा आदेश /निर्णय वैध आहे काय? तसेच एखाद्या अनियमिततेसाठी जबाबदार कोण? अशी माहिती मागतात. प्रश्नार्थक माहिती | कलम-८(क) खाली सदर माहिती नाकारता येईल. तसेच शासनाच्या अभिलेखांमध्ये उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या प्रतींच्या स्वरूपात पुरविणे अपेक्षित आहे. मुद्यांवरील मते कोणती कार्यवाही केली जाईल, इत्यादीचा समावेश माहितीच्या व्याख्येत |

| | | |
|---|---|---|
| | | होणार नाही व अशी माहिती देता येणार नाही असे यापूर्वीच दि.५.८.२००४ च्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आलेले आहे. तसेच काही प्रकरणी माहिती पुरविण्यासाठी वरिष्ठांचे आदेश घेवून निर्णय घ्यावा लागतो व त्यास ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधी लागतो, अशी माहिती ह्या कायद्याखाली पुरविणे अपेक्षित नाही. |
| ७ | पदाधिकारी यांनी दिलेल्या सूचनांची माहिती पुरवावी किंवा कसे ? | होय, सदर माहिती पुरविता येते. |
| ८ | जी प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत त्याबाबत कागदपत्रे/माहिती द्यावी काय ?<br>जेथे न्यायालयाने माहिती देण्यास मज्जाव केलेला आहे अशी माहिती देता येणार नाही | जर एखाद्या न्यायप्रविष्ट प्रकरणाची माहिती दिल्यास कलम-७(ज) व (ख) खाली ज्यामुळे गुन्हेगारांचे अन्वेषण करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे यामध्ये अडथळा येईल, अशी माहिती देता येणार नाही. अशी माहिती दिल्यास शासनाची बाजू मांडतांना त्याचा विपरीत परिणाम होणार असेल व न्यायालयाचा कोणत्याही प्रकारे अवमान होण्याची शक्यता असेल तर अशी माहिती देता येणार नाही. |
| ९ | जर शासकीय माहिती अधिकारी दीर्घ मुदतीच्या रजेवर असेल तर माहिती कशी पुरवावी ? IPO AIO | शासकीय माहिती अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करणाऱ्या अधिकाऱ्याने माहिती पुरवावी |
| १० | शिक्षेची तरतुद माहिती अधिकाऱ्यांबरोबरच ती माहिती ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून घ्यावी लागते त्यांना सुध्दा शिक्षेची तरतूद लागू आहे काय ? | होय. शासकीय माहिती अधिकाऱ्यांबरोबरच त्यांना माहिती ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून घ्यावी लागते त्यांनाही विलंब झाल्यास जबाबदार धरावे. |
| ११ | जर काही माहिती इंटरनेटच्या माध्यमातून वेबसाईटद्वारे उपलब्ध असेल तर ती नाकारता येईल काय ? | होय. मात्र, वेबसाईटवरुन माहिती कशी घ्यावी व कोणत्या विषयाखाली ती उपलब्ध आहे याची माहिती अर्जदारास देण्यात यावी. ( With details of Navigation ) मात्र प्रत्येक ठिकाणी ही सुविधा उपलब्ध आहे का याचाही विचार करणे उचित ठरेल. |
| १२ | वैयक्तिक अग्रिमाबाबतच्या प्रतिक्षा यादीसारखी माहिती द्यावी काय ? कारण यात व्यापक जनहिताचा मुद्दा लागू होत नाही. | जरी यात व्यापक जनहिताचा मुद्दा लागू होत नसेल तरी सदर माहिती शासनाच्या पारदर्शकता व स्वच्छ प्रशासनाशी संबंधित असल्यामुळे पुरविण्यात यावी. |
| १३ | आवश्यक शुल्कासह अर्ज प्राप्त झाला नसल्यास अर्ज फेटाळता येणे शक्य आहे काय ? तसेच अर्ज अपूर्ण, निनावी अथवा सहीशिवाय असल्यास फेटाळता येईल काय ? | होय. मात्र, अर्जदाराला परिपूर्ण अर्ज करण्यास मार्गदर्शन करण्यात यावे. |
| १४ | काही कार्यालयांत माहिती व कागदपत्रे पुरविण्यासाठी प्रति पृष्ठ ५० पैसे पेक्षा जास्त खर्च येत असतांना व काही कार्यालयांत झेरॉक्स, टंकलेखन यंत्र इत्यादी सुविधा नसतात अशावेळी काय शुल्क आकारणी करावी ? | जर काही माहिती पुरविण्यास जास्त खर्च होत असेल तर कलम-६(२) खाली अर्जदारास कळवून त्यांच्याकडून वाढीव शुल्क आकारता येते. मात्र, प्रत्यक्ष झालेल्या खर्चापेक्षा जास्त शुल्क आकारण्यात येऊ नये. |

रु २ प्रति झेरॉक्स + पोस्टाचा खर्च

| | | |
|---|---|---|
| १५ | नकारात्मक उत्तर देण्यापूर्वी प्रत्येक वेळी कलम-७(अ) खाली समितीची परवानगी घ्यावी लागेल काय ? | नाही. ज्याप्रकरणी भारताचे सार्वभौमत्व व सार्वभौमत्व व एकात्मतेशी संबंधित कागदपत्रे, अंतर्गत सुरक्षितता, विदेशी राज्यांशी असलेले संबंध यावर परिणाम होईल. म्हणजेच फक्त कलम ७(क) नुसार माहिती देण्याचे नाकारावयाचे असल्यास अशा प्रकरणी कलम-२(२) खाली गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीकडे प्रकरण पाठविण्याची गरज आहे |
| १६ | माहिती अधिकार कायद्याखाली काही कार्यालयात मोठया प्रमाणावर अर्ज येत आहेत. यामुळे नियमित शासकीय कामावर विपरीत परिणाम होतो. तसेच १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. | सक्षम प्राधिकारी यांना अधिक शासकीय माहिती अधिकारी नियुक्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. आवश्यक असल्यास, त्यांनी ज्या कार्यालयात जास्त अर्ज प्राप्त होत आहेत त्या कार्यालयात अधिक शासकीय माहिती अधिकारी नियुक्त करून ही समस्या दूर करणे शक्य आहे. |
| १७ | काही संस्थांनी या कायद्याविषयी काही पुस्तिका छापलेल्या आहेत. त्या लोकांना पुरविण्याची व्यवस्था करावी. | प्रत्येक जिल्हाधिकारी किंवा तहसील कार्यालयात, "सेतू" किंवा इतर योग्य स्थानिक संस्थामार्फत अशा प्रकारच्या पुस्तिकांचे प्रकाशन व वाटप लोकांच्या सोयीसाठी करण्यात यावे. शक्यतो अशा पुस्तिका कमीत कमी दरात उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी व यासाठी सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी पुढाकार घ्यावा. |
| १८ | नेमकी कोणती माहिती मिळविण्याकरिता कोणत्या अधिकाऱ्याकडे अर्ज करावा याबाबतची माहिती शासनाने उपलब्ध करुन द्यावी. | अशी माहिती संकलित करण्याचे काम यशदा, पुणे यांच्यामार्फत सुरु असून यास काही वेळ लागण्याची शक्यता आहे. तोपर्यन्त सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी अशाप्रकारच्या माहितीच्या पुस्तिका सोप्या भाषेत तयार कराव्यात व विविध माध्यमातून यास प्रसिध्दी देण्यात यावी. काही मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या विभागाच्या वेबसाईटवर त्यांच्या योजनांची व कामाची अद्यावत माहिती अजूनही प्रसिद्ध केली नाही, ती लवकरात लवकर करावी. |
| १९ | कार्यालयीन टिप्पणीत किंवा इतर कागदपत्रांवर लोकप्रतिनिधी यांनी दिलेले आदेश किंवा शेरे याच्या प्रती सदर अधिनियमाखाली देण्यात याव्यात काय? | होय, जर अधिनियमाच्या कोणत्याही कलमांच्या तरतूदीखाली द्यावयाच्या माहितीला सूट देण्यात आली नसेल तर ती माहिती देण्यात यावी. |
| २० | अधिनियमात लेखी स्वरूपात माहिती उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. याचा अर्थ असा गृहीत धरावा काय? की, अधिकारी तोंडी स्वरूपात माहिती देण्यास नाकारू शकतात? | नाही. शासन व्यवहारात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने सदर कायदा करण्यात आलेला आहे. शासकीय कार्यालयातून इतर सर्वसाधारण मार्गाने लोकांना माहिती उपलब्ध होत नसल्यामुळे सदर कायदा लागू करण्यात आला आहे. तोंडी स्वरूपात |

| | | |
|---|---|---|
| | | किंवा इतर सर्वसाधारण मार्गाने अर्जदारास माहिती देण्यास सदर कायद्यात कोणताही प्रतिबंध नाही. |
| २१ | काही इतर कायदा/नियमांतील विशिष्ट शुल्कांची आकारणी करण्यात येते. (उदा.काही कागदपत्रांच्या प्रती देण्यासाठीचे शुल्क इत्यादी) अशा प्रकरणी या अधिनियमातील तरतूदींप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात यावी किंवा माहितीच्या अधिकार अधिनियमाप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात यावी? | एखाद्या प्रकरणी यापैकी ज्या अधिनियमाखाली अधिक शुल्क प्रस्ताविण्यात आले आहे त्या शुल्काची आकारणी करण्यात यावी. |
| २२ | काही अर्जदार हे नागरीक नसून संस्था/संघटना किंवा त्यांचे प्रतिनिधी/पदाधिकारी असतात. त्यांना माहिती मागण्याचा अधिकार आहे काय? | होय, जर एखादा नागरिक एखाद्या संस्थेचा सभासद असेल किंवा पदाधिकारी असेल आणि त्याने त्या संस्थेच्या लेटरहेडवर अर्ज केला असेल तरी तो नागरिक या संज्ञेत मांडतो व त्याला माहिती मागण्याचा अधिकार आहे. |
| २३ | अधिनियमाच्या कलम-९(१)-ब खालील तरतूदींचा बोध होत नाही. या कलमाखाली १५ वर्षापूर्वी झालेल्या बाबी संदर्भात कोणतीही माहिती पुरविण्याची तरतूद आहे. | १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त जुने सर्व शासकीय अभिलेख कोणत्याही व्यक्तीला उपलब्ध व्हावेत हा या कलमाचा हेतू आहे. म्हणजेच जरी एखाद्या प्रकरणात कलम ७ किंवा ८ च्या तरतूदी लागू होत असतील तरी सदर प्रकरण १५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त जुने असल्यास त्याबद्दल माहिती पुरविणे बंधनकारक आहे. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( वंदना कृष्णा )**
**शासनाचे सचिव**

प्रत :-

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव,
*७) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*८) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
*९) महाप्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*१०) महाप्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
*११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*१३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४) सर्व विभागीय आयुक्त,
१५) सर्व जिल्हाधिकारी / जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६) सर्व मंत्रालयीन विभाग, व सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१७) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग / कार्यालय प्रमुख,
१८) सर्व महानगरपालिका आयुक्त,
*१९) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-४११ ००७
२०) सा.प्र.वि./का.२९ यांना शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर व इंट्रानेटवरील सा.प्र.वि.च्या साईटवर प्रसिद्ध करण्याकरीता.
२१) राज्य स्तरीय परिषदेचे सर्व सदस्य.
२२) निवड नस्ती. (२ प्रती)

* (पत्राने)

H-693-2 अ

3112